॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

हाव सोडली की मोह संपतो
आणि मोह संपाला की दुःख संपते.




अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३ रा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

## SPOT NEWS

### अमित शहा २ दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर

● **मुंबई** – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे २ दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. शनिवारी ते रायगड किल्ल्याला भेट देणार आहेत. त्यानंतर मुंबईत त्यांचे कार्यक्रम आहेत. रायगड किल्ल्यावरील कार्यक्रम आटोपल्यानंतर ते राष्ट्रवादी अजित पवार गटाचे खा. सुनिल तटकरे यांच्या सुतारवाडी येथील निवासस्थानी भोजनाला जाणार आहेत. त्यामुळे अमित शहा यांच्या या दौऱ्यात रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा वाद देखील सुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शुक्रवारी संध्याकाळी उशीरा ८ वाजता त्यांचे पुणे येथे आगमन होईल. त्यानंतर शनिवारी सकाळी साडेदहा वाजता पाचाड येथे राजमाता जिजाउंच्या समाधीचे दर्शन घेतील. नंतर ११ वाजता ते रायगड किल्ल्याला भेट देतील. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला ते वंदन करतील. नंतर किल्ल्यावर त्यांच्या उपस्थितीत काही कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. दुपारी २ वाजता ते सुतारवाडी येथील सुनिल तटकरे यांच्या निवासस्थानी भेट देणार आहेत. दुपारचे जेवण ते तटकरेंच्या घरीच करतील. त्यानंतर साडेतीन वाजता अमित शहा यांचे मुंबईत आगमन होईल.

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक एसटी महामंडळाचे नवे अध्यक्ष!

● **मुंबई** – राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रताप सरनाईक यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे आभार मानले आहेत. एसटीला भविष्यात आर्थिकदृष्ट्या सक्षम करून एक चांगली दर्जेदार परिवहन सेवा निर्माण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असेही ते म्हणाले. प्रताप सरनाईक हे एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष असणार आहेत. महाराष्ट्र शासन केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेल्या नियम व आदेशानुसार प्रताप सरनाईक यांच्यावर एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. सरनाईक यांच्या आधी मुख्य सचिव संजय सेठी यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदावर निवड करण्यात आली. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आपला निर्णय मागे घेतला आणि एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदासाठी अधिकृतपणे प्रताप सरनाईक यांच्या नावाची घोषणा केली.

# तहव्वूर राणाला भारतात आणले

## राणा मुंबई हल्ल्याचा मुख्य सूत्रधार । एनआयए चौकशी करणार

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आले आहे. एनआयएचे आयजी बत्रांच्या नेतृत्वात विशेष पथक राणाला घेऊन भारतात पोहचले आहे. आता तहव्वूर राणाची एनआयए मुख्यालयात चौकशी होणार आहे.

मुंबई हल्ल्याच्या कटात सहभागी असलेल्या तहव्वूर राणाला २००९ साली अमेरिकेत अटक करण्यात आली होती. आता त्याला भारतात आणण्यात आले आहे. अमेरिकन कोर्टाने अनुमती दिलेल्या कलमांनुसारच तहव्वूर राणावर खटला चालवण्यात येणार आहे. अमेरिकेत खटला चालला असताना भारतात पुन्हा खटला का चालवता? असा सवाल तहव्वूर राणाने केला होता. मात्र भारताने राणाचा दावा खोडून काढत आंतरराष्ट्रीय कायद्यांचा दाखला दिला. सोबतच



राणावरील आरोप गंभीर असल्याने भारतातही खटला चालवू शकतो असा दावा भारत सरकारच्या वकिलांनी अमेरिकन कोर्टात केला होता.

मुंबई दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाचे इस्रायलकडून स्वागत करण्यात आले आहे. दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारत सरकारच्या चिकाटीबद्दल आभार असे इस्रायलचे भारतातील राजदूत रुवेन अझर यांनी म्हटले.

तहव्वूर राणा भारतात आणण्यात आल्यानतंर पाकिस्तानने मात्र राणापासून हात झटकले आहेत. राणा हा कॅनडाचा नागरिक आहे, त्याचा पाकिस्तानशी आता संबंध नाही, असे पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले. राणाने गेल्या दोन दशकांपासून त्याच्या पाकिस्तानशी संबंधित कागदपत्रांचे नूतनीकरण केलं नसल्याचा दावाही पाकिस्ताननं केला. राणाच्या चौकशीतून पाकिस्तानचा पर्दाफाश होईल असे कायदेतज्ज्ञ बोलत आहेत. पण त्याआधीच पाकने राणापासून फारकत घेतल्याचं दिसून येत आहे.

तहव्वूर राणाला आझाद मैदानात सार्वजनिकरित्या फाशी द्या अशी मागणी शहीद तुकाराम ओंबळेंचे भाऊ एकनाथ ओंबळेंनी केली आहे. कसाबला फाशी देण्यास विलंब झाला, यावेळी तसे करू नका अशी मागणीही एकनाथ ओंबळे यांनी केली.

### कोण आहे तहव्वूर राणा?

■ १९६१ मध्ये पाकिस्तानमध्ये जन्मलेल्या तहव्वूर राणाने सुरुवातीला पाकिस्तानी सैन्यात डॉक्टर म्हणून काम केले आणि नंतर १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात तो कॅनडाला गेला. कॅनेडियन नागरिकत्व मिळाल्यानंतर, तो शिकागो येथे स्थायिक झाला. तिथे तो इमिग्रेशन कन्सल्टन्सीसह विविध व्यवसाय चालवत होता. मुंबईमध्ये २००८ साली झालेल्या दहशतवादी हल्ल्याप्रकरणी तहव्वूर राणाला अमेरिकेत अटक करण्यात आली होती. या हल्ल्यात १६० हून अधिक लोक मारले गेले होते. प्रेषित मुहम्मदचे वादग्रस्त व्यंगचित्र प्रकाशित करणा–या जिलँड्स–पोस्टेनवरील हल्ल्याच्या प्रयत्नाशीही त्याचा संबंध होता. राणावर १२ गुन्ह्यांचा आरोप होता, ज्यामध्ये अमेरिकन नागरिकांच्या हत्येला मदत करणे आणि प्रोत्साहन देणे यांचा समावेश होता.

## बँक व्यवहारात मराठी भाषा सक्ती करण्यासाठी मनसे आक्रमक

● **मुंबई । वीरभूमी–**

राज्यातील बँकांमध्ये मराठी भाषेची सक्ती करण्यासाठी पुकारलेले आंदोलन मनसेने तूर्तास स्थगित केले असले तरी यासंदर्भात राज ठाकरे यांनी आता थेट आता इंडियन बँक असोसिएशनला पत्र पाठवून कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी बँकाची असल्याचा इशारा दिल्याचे सांगितले जात आहे.

बँकांमधील मराठी भाषा वापराबाबत राज ठाकरे यांनी जाहीर केलेल्या भूमिकेनंतर मनसेचे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई यांच्यासह मनसे नेत्यांच्या शिष्टमंडळाने इंडियन बँक असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुलकुमार गोयल यांची भेट घेतली. याबाबत बाळा नांदगावकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना माहिती दिली.

गुढीपाडव्याच्या भाषणात राज साहेबांनी महाराष्ट्र व मुंबई येथील बँकांमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य आहे अशी भूमिका मांडली. तसेच रिझर्व बँकेने काही नियम आखून दिले. त्यामध्ये मराठी भाषेचा वापर हा बँकेच्या नियमित कार्यासाठी वापरावा. त्यामुळे बँकेत आमची काही कार्यकर्ते गेल्यामुळे तेथील काही अधिकाऱ्यांनी उद्दामपणा करत बोलले, त्यामुळे आम्ही युनियन बँक असोसिएशन ही एक संस्था आहे.

यातील डायरेक्टर यांची वेळ घेतली, हे डायरेक्टर भारतभर काम करून आल्यामुळे त्यांना विविध भाषांची ज्ञान आहे. या बँकेचे अध्यक्ष अतुल कुमार गोयल यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज साहेबांनी बँकेच्या मराठी भाषा वापरण्यास संबंधित काढलेले पत्र देण्यात आले. तसेच रिझर्व बँकेने या नियमाने अटी घातलेले आहेत. त्याचेही पत्र त्यांना देण्यात आले. दुर्दैवाने आम्ही तिकडे गेले असताना विधी विभागात फक्त एक मराठी माणूस काम करत आहे.

## पाथर्डी शहरात अपघात; ट्रकच्या चाकाखाली सापडून तरुणाचा मृत्यू

● **पाथर्डी । वीरभूमी–**



शहरात गुरुवारी कायम गजबज असलेल्या कोरडगाव रोडवरील चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर लाकडाने भरलेल्या अवजड ट्रकच्या मागच्या चाकाखाली सापडुन विकास परमेश्वर सोनवणे, (वय-२० वर्षे) रा. निपाणी जळगाव या युवकाचा जागीच मृत्यु झाला. रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या गाडीमुळे हा अपघात झाल्याचे प्रत्यक्ष दर्शनी लोकांनी सांगितले. दोन वाहनांच्या मधुन जाताना मोटारसायकलस्वाराचा तोल गेला आणि खाली पडलेल्या विकासाच्या डोक्यावरुन लाकडाने भरलेल्या ट्रकचे चाक गेल्याने त्याचा क्षणात मृत्यु झाला.

निपाणी जळगाव येथील विकास सोनवणे हा युवक पाथर्डी शहरात अभ्यासिकेमध्ये पोलिस भरतीच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी येत होता. विकासची आई काहीतरी सामान घेण्यासाठी दुकानात गेली होती. तेवढ्यात विकास गाडीवरुन जात होता. रस्त्याच्या कडेला इको कंपनीची गाडी रस्त्यावर उभी केलेली होती. त्याचवेळी शेजारुन चाललेला लाकडाने भरलेल्या बारा चाकाचा ट्रक जात होता. रस्त्यालगत उभी केलेली इको गाडी व ट्रक यांच्यामध्ये विकासची मोटारसायकल गेली. यावेळी तोल गेल्याने विकास सोनवणे खाली पडला व त्यांच्या डोक्यावरुन ट्रकचे मागचे चाक गेले. विकास मोठ्याने ओरडला मात्र क्षणात फट आवाज झाला आणि त्याचा आवाज बंद झाला.

विकास सोनवणे मोटारसायकल चालवताना भ्रमण दुरध्वनीवर बोलत असल्याचे अपघात पाहणाऱ्यांनी सांगितले. गाडी चालवताना फोनवर बोलु नये एवढा साधा नियम आजचे युवक पाळणार नसतील तर मग अशा अपघाताच्या घटना रोज घडतील. तो फोन विकासचा कायमचा ठरला. काही वेळात त्याठिकाणी पोहचलेली विकासची आईने मुलाचा रस्त्यावर पडलेला मृतदेह पाहून हंबरडा फोडला. यावेळी उपस्थितांचे मने ही कासावीस झाली. आई टाहो फोडुन रडत होती. ह्रदय पिळवटुन टाकणारी ही घटना मनाला वेदना देणारी आहे. मात्र युवकांच्या डोळ्यात अंजण घालणारी देखील आहे.

शहरात रस्त्यावर उभ्या केलेल्या दुचाकी व चारचाकी गाड्या ह्या वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. याबाबत पोलिसांना वेळोवेळी माहीती देवुनही पोलिस कारवाई करीत नाहीत. कारवाई केली तर राजकीय हस्तक्षेप ठरलेलाच. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर रस्त्यावर चारचाकी गाड्या, वाहतुक करणारे टेम्पो व दुचाकी उभ्या केलेल्या असतात. आम्ही पोलिसांना हप्ते देतो पोलिस आमच काही करणार नाहीत अशी मुजोरगिरी येथील काही वाहन चालक करीत आहेत. अपघाताला कारण ठरणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी निपाणी जळगावच्या ग्रामस्थांनी पोलिसाकडे केली आहे.

### महामार्गावरील रोहित्र कधी हटवणार

■ राष्ट्रीय महामार्गावरच महावितरणचा रोहित्र आहे. ती कधी हटवणार. काही महिन्यांपूर्वी शहरातील एका युवकाचा असाच अपघात याच ठिकाणी झाला होता. तरीही काही उपाय योजना झाली नाही. आणखी किती जणांचे बळी घेतल्यावर प्रशासन उपाययोजना करणार असा सवाल शहरातील नागरिकांनी विचारला आहे.

## महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशनात

# मंदिर विश्वस्तांचा उत्साही सहभाग

● **सोलापूर । वीरभूमी –**

श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा आणि पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिरातील संवर्धनाचे काम करताना पुरातत्व विभागाने मंदिर, देवतांच्या मूर्ती, मंदिरांतील पुरातन परंपरा, तसेच मंदिराचे ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्व यांची हेळसांड करू नये असे झाल्यास मंदिर विश्वस्त, भक्त आणि हिंदू रस्त्यावर उतरून याचा विरोध केल्याशिवाय राहणार नाही. मंदिर महासंघाचाही याला विरोध असेल. मंदिर संस्कृती रक्षणासाठी मंदिर विश्वस्त आणि पुजारी यांचा परस्पर समन्वय आणि संघटन आवश्यक आहे, असे मत मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी व्यक्त केले.




ते पद्मावती कन्व्हेन्शन हॉल, अक्कलकोट रोड, एमआयडीसी येथे आयोजित जिल्हास्तरीय महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशनात ते बोलत होते. या अधिवेशनात सोलापूर, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांतील मंदिर विश्वस्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अधिवेशनाची सुरुवात सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडे, सुनील घनवट, निवृत्त सहधर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख, प्रज्ञापूरी ज्ञानपीठाचे पिठासन धर्माधिकारी प्रसाद पंडित, श्री तुळजाभवानी पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, पंचमुखी हनुमान मंदिराचे विश्वस्त आणि उद्योजक. सत्यनारायण गुर्रम यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा संदेश पू. (कु.) दीपाली मतकर यांनी वाचला, तर अधिवेशनाचे सूत्रसंचालन मिनेश पुजारे यांनी केले. यावेळी दीलीप देशमुख यांनी मंदिरांसंदर्भातील कायदेविषयक मार्गदर्शन केले.

## टेरिफ वॉर : टीव्ही, फ्रिज, इलेक्ट्रॉनिक वस्तू भारतात स्वस्त होणार!

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या शुल्क वाढीमुळे व्यापार युद्ध भडकले आहे. विशेषत: अमेरिका आणि चीनमधील व्यापार व्यवहारात अधिक तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. पण या दोन्ही देशांमधील व्यापार युद्धाचा भारतीय ग्राहकांना फायदा होण्याची शक्यता अधिक आहे. कारण अमेरिकेसोबतच्या तणावादरम्यान चीनमधील अनेक इलेक्ट्रॉनिक कंपन्या भारतीय कंपन्यांना ५ टक्क्यांपर्यंत किमती कमी करण्याच्या ऑफर्स देऊ लागल्या आहेत. याचाच अर्थ असा आहे की, येणाऱ्या काही दिवसात स्मार्टफोन, टीव्ही, फ्रिज आणि इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या किमती भारतात कमी होऊ शकतात.

भारतात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांत वापर होणाऱ्या सर्व भागांपैकी सरासरी तीन-चतुर्थांश सुटे भाग चीनमधून आयात होतात.

'जीटीआरआय'च्या अलीकडील एका अहवालानुसार, भारताची आर्थिक वर्ष २०२४ मध्ये इलेक्ट्रॉनिक्स घटकांची आयात मागील वर्षाच्या तुलनेत ३६.७ टक्क्यांनी वाढून ३४.४ अब्ज डॉलर्सवर पोहोचली.

### ट्रम्प टॅरिफला ९० दिवस स्थगिती

■ अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ट्रम्प टॅरिफमुळे जगभर आर्थिक उलथापालथ होत असताना आज ऐनवेळी ट्रम्प यांनी ७५ देशांच्या आयात वस्तूंवरील वाढीव कराला ९० दिवसांची स्थगिती दिली. त्यामुळे भारतासह या ७५ देशांना दिलासा मिळाला आहे. परंतु त्याचवेळी चीनवर मोठा आर्थिक प्रहार केला. चिनी उत्पादनांवर थेट १२५ टक्के आयात शुल्क आकारण्याची घोषणा केली. त्यामुळे दोन्ही देशांत व्यापार युद्ध भडकण्याची शक्यता आहे. याआधी अमेरिकेने हा दर वाढवून १०४ टक्के केला होता. त्यानंतर चीननेही अमेरिकेतून येणाऱ्या उत्पादनांवर आयात शुल्क वाढवून ८४ टक्के केले. आता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनच्या वस्तूंवर १२५ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली. दुसरीकडे भारतासह७५ देशांना ट्रम्प टॅरिफ'मधून ९० दिवसांसाठी दिलासा दिला. या कालावधीत फक्त १० टक्के शुल्क लागू राहणार आहे. जगातील अनेक बड्या देशांमध्ये व्यापारी तणावाने टोक गाठलेले असताना हा निर्णय आला आहे.

# SPOT NEWS

## शहरात रविवारी माळी वधू-वर मेळाव्यानिमित्त भिंती पत्रकाचे अनावरण

● **नगर । वीरभूमी-**
क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून १३ एप्रिल रोजी शहराच्या टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात माळी वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या भिंती पत्रकाचे अनावरण करुन सर्व समाजबांधवांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रुई छत्रपती (ता. पारनेर) येथील माजी सरपंच बाळासाहेब बारवकर म्हणाले की, पालकांच्या वाढलेल्या अपेक्षा, शिक्षण व करियच्या मागे धावणाऱ्या युवक-युवतींसाठी लग्नाचे विषय गंभार बनत चालले आहे. वधू-वर परिचय मेळाव्यातून सर्व समाजबांधवांना एकत्रित आणून हा प्रश्न सोडविण्यासाठी सुरु असलेले कार्य दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या वर्षभरात जनवार्ता परिवाराने ३५ विवाह वधू-वर मेळाव्याच्या माध्यमातून जमविले आहे. हा सहावा वधू वर मेळावा आहे. प्रथम वधू-वर, घटस्फोटीत विधवा, विधूर अपत्य, विनाअपत्य, दिव्यांग अशा सर्वांसाठी माळी वधू-वर मेळाव्याचे आयोजन केले असून, वधूसाठी कायमस्वरूपी मोफत नोंदणीची सेवा दिली जात आहे. जनवार्ता परिवाराचे पोपट बनकर, ॲड. महेश शिंदे, गणेश बनकर यांच्या माध्यमातून हा मेळावा पार पडणार आहे. महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाणी होत असलेल्या अहिल्यानगर शहरातील या वधू-वर परिचय मेळाव्यात विविध जिल्ह्यातून समाजबांधव सहभागी होणार आहेत.

## कर्जत शहरात भगवान महावीर स्वामींची जयंती उत्साहात साजरी

● **कर्जत । वीरभूमी-**
कर्जत शहरात भगवान महावीर स्वामींची जयंती भारतीय जैन संघटनेचेवतीने मोठ्या उत्साहात विविध उपक्रमांने साजरी करण्यात आली. पारंपारिक वाद्यासह शिस्तबद्ध मिरवणूक या शोभायात्रेचे मुख्य वैशिष्ट्ये ठरले. गुरुवार, दि. १० रोजी सजविलेल्या रथात जैन स्थानकातून शोभायात्रेस सकाळी ८:३० वाजता प्रारंभ झाला. आकर्षक सजविलेल्या रथात भगवान महावीर स्वामींची प्रतिमा विराजमान करीत पुरूष बांधवानी पांढरे वस्त्र तर महिलांनी लाल रंगांची साडी परिधान करीत मिरवणुकीत सहभागी झाले होते. रथाच्या समोर टिपरी पथक, सुमधुर बँड पथक आणि भगवान महावीर स्वामींच्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता. मिरवणुक मार्गावर विविध ठिकाणी महावीर स्वामींच्या प्रतिमेस मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. आराधना भवन येथे जन्म वाचन कार्यक्रम पार पडला. यासह विविध चढावे, स्वप्नदर्शन चढावे, जन्मोत्सव व जन्मवाचन चढावे याचा सर्वांनी लाभ घेतला. जैन समाजातील विविध तपस्वी व संघटनेचे नूतन पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. तसेच बाजारतळ येथील अहिंसा स्मारकास आकर्षक सजावट करण्यात आली होती. यासाठी भारतीय जैन संघटनेचे विभागीय कार्यकारणी सदस्य प्रसाद शहा, जिल्हा कार्य कार्यकारिणी सदस्य विजय खाटेर, प्रवीण मुनोत यांच्यासह कर्जतचे अध्यक्ष निलेश बोरा, उपाध्यक्ष दीपक शहा, सचिव सुमित खाटेर, सहसचिव आनंद बलदोटा, युवा अध्यक्ष विशाल बलदोटा, उपाध्यक्ष पंखिल शहा, भूषण देसरडा, किशोर बोथरा, विनोद छाजेड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# अवैध धंदे बंद करण्यासाठी स्वाभिमानीचे उपोषण

### थोडा वेळ द्या, अवैध धंद्यावर कारवाई करु : शेवगाव पोलिसांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

● **शेवगाव । वीरभूमी -**
शेवगाव तालुक्यात सुरू असलेले अवैध धंदे हे ताबडतोब बंद करावे. तसेच शहरांमध्ये होत असलेल्या चोरींच्या घटनांचा तात्काळ तपास करण्याच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेवगाव पोलिस ठाण्यासमोर उपोषण केले. यावेळी पोलिस निरीक्षक समाधान नागरे यांनी थोडा वेळ द्या, अवैध धंद्यावर कारवाई करु असे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.



शेवगाव शहरासह तालुक्यामध्ये अवैध धंदे जोरात सुरु असून शहरामध्ये भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. तसेच या चोऱ्यांचा तपास पोलिसांकडून होत नाही. त्याचबरोबर चोरी झाल्यानंतर संबंधित पोलीस स्टेशनला आल्यानंतर त्यांची तक्रार घेतली जात नाही. त्यांना पोलिसांकडून अरेरावीची भाषा केली जाते. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई व्हावी, तसेच चोरीच्या घटनांमधील जे आरोपी आहेत. त्यांना तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आज सकाळी शेवगाव पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषण केले.

यावेळी शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली व येथे आठ दिवसांमध्ये कारवाई करू, अशी आश्वासन दिले. तसेच आज शेवगाव शहरांमध्ये रामनवमीची मिरवणूक असल्या कारणाने पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे, असे नागरे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितल्यानंतर पदाधिकारी यांनीही पोलिसांना सहकार्य करण्याचा निर्णय घेत उपोषण मागे घेतले.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शरद शिंदे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते मच्छिंद्र आर्ले, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता फुंदे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, बाळासाहेब शिंदे, शेवगाव तालुकाध्यक्ष प्रवीण भराट, तालुका उपाध्यक्ष अशोक भोसले, शहराध्यक्ष अमोल देवढे, दादासाहेब पाचरणे, माऊली धनवडे, शेषराव आपशेटे, नानासाहेब कातकडे, अंबादास भागवत, हरिभाऊ कबाडी, सलिम पठाण, सुरेश गरड, सुनील देसरडा आदी पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते.

## राजुर येथे महावीर जयंती उत्साहात



● **अकोले । वीरभूमी-**
राजूर येथे भगवान महावीर जयंती निमित्ताने जैन समाजाच्या वतीने गुरु महाराजांच्या उपस्थित विधीमय पूजा करून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

राजूर येथील गुजराती, जैन समाजबांधवांनी गुरुवारी सकाळी पार्श्वनाथ भगवान मंदिरात नित्याची पाठ केली. यानंतर महाआरती करण्यात आली. यावेळी विश्वस्त प्रकाश शाह आणि शशिकांत ओहरा यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी चार वाजता भगवान महावीर यांच्या प्रतिमेची राजूर शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत वाद्याच्या गजरात तरुणाईने टिपरी नृत्य सादर केले. यात महिलांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी सुनीलशेठ शहा, पंकज ओहरा, सुधीर ओहरा, ब्रिजेश् ओहरा, अल्पेश मेहता, शैलेश ओहरा, अनिकेत शहा, हर्षद ओहरा, दर्शन ओहरा, निखिल मेहता, गुजराथी सर आदीसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## अकोले तालुका जागृत मंचाच्या तालुकाध्यक्षपदी कमल वायाळ यांची निवड

● **अकोले । वीरभूमी-**
संगमनेर येथील लोकपंचायत संस्थेच्या बहिणा प्रकल्पांतर्गत महिला अन्याय अत्याचारा विरोधात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अकोले विभागात स्वतंत्रपणे जागृत महिला मंच ची स्थापना केली. या जागृत महिला मंचाच्या अध्यक्षपदी कोमल वायाळ यांची एकमताने निवड करण्यात आली.

अकोले तालुक्यातील कोतुळ व राजूर विभागातील २० गावांमधील महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या. या बैठकीत जागृत महिला मंचचे ध्येय धोरणे, उद्देश या विषयी सविस्तर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सर्वानुमते तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून काम करण्याचा निर्धार केला.




या कार्यकारीणी मध्ये अध्यक्षपदी कोहणे येथील कमल एकनाथ वायाळ, उपाध्यक्षपदी लव्हाळी ओतुर येथील संजीवनी खंडू लहामटे तर सचिवपदी धामणगाव पाट येथील मंदा बाबाजी घुले यांची निवड करण्यात आली. तालुका कार्यकारिणी सदस्य म्हणून योगिता विजय नाडेकर (कोथळे), गंगुबाई सुरेश नाडेकर (कोथळे), पद्मिनी मच्छिंद्र भांडकोळी (वांजुळशेत), शांता लहानु कोंडार (वांजुळशेत), सिताबाई चंद्रकांत धिंदळे (शिरपुंजे), आशा भिमा नाडेकर (घोटी), लता मनोज शेंडे (सोमलवाडी), शिला भाऊराव लहामटे (लव्हाळी ओतूर), मंगल भगवंता शेळके (विठे) यांची निवड झाली आहे. या बैठकीत सविता पांडे, जयश्री जाधव, वैष्णवी जुनगडे, जिजा घोटकर व नारायण सावंत यांनी मार्गदर्शन केले.

## फिनिक्स मार्केटसिटी, पुणे घेऊन आले आहे

# प्रीहिस्टोरिक ॲडव्हेंचर : डायनासोर वर्ल्ड

### ११ एप्रिल ते ४ मे २०२५ दरम्यान लिबर्टी स्क्वेअर येथे होणार इव्हेंट । अविश्वसनीय अनुभव मिळणार

● **पुणे । वीरभूमी-**
या उन्हाळ्यात, फिनिक्स मार्केटसिटीचा मोस्ट अवेटेड इव्हेंट - हॉलिडे लँड आता डायनासोर वर्ल्डच्या माध्यमातून तुम्हाला घेऊन जाणार आहे एका थरारक प्राचीन दुनियेच्या प्रवासावर.. ११ एप्रिल ते ०४ मे २०२५ दरम्यान लिबर्टी स्क्वेअर येथे हा इव्हेंट होणार आहे. हा अविश्वसनीय अनुभव मुलांसाठी आणि कुटुंबांसाठी मौजमस्ती, माहिती आणि ॲडव्हेंचरची मेजवानी घेऊन येणार आहे.




**प्रीहिस्टोरिक जायंट्स पहा अगदी जवळून :** डायनासोर वर्ल्ड मध्ये मेसोजोइक युगातील जादू पुन्हा जिवंत केली गेली आहे- ज्यामध्ये टी-रेक्स, ब्रॅकिओसॉरस आणि प्टेरोडॅक्टिल्ससारखे आयकॉनिक डायनासोरस त्यांच्या खऱ्याखुऱ्या आकारामध्ये बघायला मिळणार आहेत. लिबर्टी स्क्वेअर एका प्राचीन जंगलात रूपांतरित झालं आहे जिथे खरेखुरे डरकाळीचे आवाज, सेन्सरवर चालणारे प्राणी आणि संपूर्ण थीमच तुमचा अनुभव अधिक जिवंत आणि थरारक बनवतो.

**डायनासोरपेक्षा अधिक**

हा रोमांच इथेच थांबत नाही. एक्सकॅव्हेशन झोन मुलांना डायनासोरची अंडी आणि जुने स्केलेटन्स शोधायला आकर्षित करतात. ज्यामुळे ॲबडव्हेंचरमध्ये शोधमोहिमेची वेगळीच मजा जोडली जाते. संपूर्ण कुटुंबासाठी इंटरॲक्टिव्ह डिस्प्ले, इंटरेस्टिंग वर्कशॉप्स आणि ॲक्टिव्हिटी झोनसुद्धा आहेत - जे मौजमस्ती आणि शिकणं यांचा सुंदर मेळ घालतात. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये हे ठिकाण फॅमिली आउटिंग्स, फ्रेंड्ससोबतचा वेळ आणि शालेय सहलींसाठी एकदम परफेक्ट आहे.

**हॉलिडे लँड - फिनिक्स मार्केटसिटीचं खास वार्षिक इव्हेंट**

हॉलिडे लँड हे फिनिक्स मार्केटसिटी पुणेचं खास वार्षिक इव्हेंट आहे, जे प्रत्येक वर्षी नवीन आणि हटके अनुभव देणारं इव्हेंट सादर करतं. यंदाचं डायनासोर वर्ल्डसुद्धा हेच सातत्य पुढे नेत असून येथे येणाऱ्या लोकांसाठी मजा, मौजमस्ती, साहस आणि थराराने भरलेला अविस्मरणीय अनुभव देतं.

**उन्हाळी सुट्ट्यांसाठी एक परिपूर्ण अनुभव**

फिनिक्स मार्केटसिटी पुणेचे सेंटर डायरेक्टर, अंशुमन भारद्वाज यांनी सांगितले आम्ही शॉपिंगच्या पलीकडे घेऊन जाणारे अनुभव लोकांसमोर सादर करतो. डायनासोर वर्ल्ड देखील शॉपिंग, एंटरटेनमेंट आणि फूड यापलीकडे जाऊन इंटरॲक्टिव्ह आणि इमर्सिव्ह अनुभव देतं.

**या सिझनमध्ये खास शॉपिंगसुद्धा**

या थरारक अनुभवासोबतच, फिनिक्स मार्केटसिटी पुणे सादर करत आहे स्प्रिंग-समर कलेक्शन - ज्यामध्ये टॉप इंटरनॅशनल आणि लक्झरी ब्रँड्सचा समावेश आहे. त्यामुळे शॉपर्सना त्यांच्या वॉर्डरोबमध्ये नवीन ट्रेंड्ससह अपडेट होण्याची संधी मिळतेय.

**फिनिक्स मार्केटसिटी पुणेबद्दल:**

फिनिक्स मार्केटसिटी पुणे हे एक प्रीमियम शॉपिंग डेस्टिनेशन आहे जे टॉप ब्रँड्स, दर्जेदार डायनिंग आणि मनोरंजन यांचा सुंदर मिश्रण देतं ज्यामुळे हे ठिकाण प्रत्येकासाठी बेस्ट चॉईस ठरतं.

### इव्हेंटची माहिती

- **ठिकाण :** लिबर्टी स्क्वेअर, फिनिक्स मार्केटसिटी पुणे
- **तारीख :** ११ एप्रिल ते ०४ मे २०२५
- **वेळ :** दुपारी २ ते संध्याकाळी ८
- **तिकीट खरेदीसाठी :** https://tinyurl.com/PMCDinosaurWorld

## संत संवादाने विश्व हिंदू परिषदेचा रामोत्सव उत्साहात



● **कोपरगाव । वीरभूमी-**
संत जनार्दन स्वामी समाधीस्थान बेट येथे संत संवादाने विश्व हिंदू परिषदेचा रामोत्सव उत्साहात संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ॲड. आलोककुमारजी यांच्या उपस्थित होते. संत जनार्दन स्वामी (समाधीस्थान) आश्रमाचे प.पूज्य स्वामी रमेशगीरीजी महाराज, प.पू.श्री राघवेश्वरनंद गिरी महाराज, विहिंप प. महाराष्ट्र संत संपर्क प्रमुख ह.भ.प. माधवदास राठी महाराज, विहिंप कोपरगाव अध्यक्ष ह.भ.प. परशुराम अनर्थे महाराज, ह.भ.प. कैवल्य जोशी महाराज, ह.भ.प. काशिनाथ मोरे महाराज, ह.भ.प. कैलाश राजगुरू महाराज, ह.भ.प. विनायक महाराज टेके, प.पू. ज्ञानानंद गिरी महाराज आदी मान्यवर संताचा संवाद होवून रामोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी मुंबई क्षेत्र धार्मिक पुंज प्रमुख संजयराव मुरदाळे, धार्मिक पुंज पश्चिम महाराष्ट्र प्रमुख संजयराव कुलकर्णी, धार्मिक पुंज पश्चिम महाराष्ट्रसह प्रमुख नागनाथजी बोंगरगे, विहिंप केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रभाकरराव शिंदे, उत्तर अहिल्यानगर जिल्हामंत्री विशाल वाकचौरे, सहमंत्री सुरेंद्र महाले व गोपाल राठी, धर्म प्रसार जिल्हा प्रमुख दीपक सिनगर, बजरंग दल जिल्हा संयोजक शुभम मुर्तडक, विशेष संपर्क प्रमुख योगेश मखाना, धर्माचार्य संपर्क प्रमुख प्रशांत बहिरट, कुणाल करंडे आदी उपस्थित होते.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

### जुनी पेन्शनबाबत प्रस्ताव स्विकारण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतरांचे धरणे

**नगर । वीरभूमी-**

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर अनुदानावर आलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी लाभार्थी शिक्षकांचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी जिल्हा परिषद येथील माध्यमिक शिक्षण विभाग समोर मंगळवारी (दि.८ एप्रिल) धरणे आंदोलन करण्यात आले. जुनी पेन्शन योजना कोअर कमिटीच्या वतीने करण्यात आलेल्या आंदोलनात शिक्षक, शिक्षकेतरांनी प्रस्ताव स्विकारण्यासाठी जोरदार निदर्शने केली. या आंदोलनात माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, संचालक बाबासाहेब बोडखे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, कार्याध्यक्ष संजय ईघे, ज्ञानदेव बेरड, रमजान हवालदार, बाळासाहेब राजळे, राज जाधव, संतोष अडकित्ते, देविदास खेडकर, सुनील दानवे, आप्पासाहेब जगताप, योगेश गुंड, वैभव सांगळे, सुभाष भागवत, संजय भुसारी, जाकिर सय्यद, बाबासाहेब मोहिते, संतोष भराट, तौसिफ शेख, राजू पठाण, सुदाम दळवी, आबासाहेब गायकवाड, बद्रीनाथ शिंदे, निवृत्ती झाडे, मोहन उंडे, आदिनाथ नागवडे, देवीदास पालवे, शिवाजी नागवडे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. माध्यमिकचे शिक्षण अधिकारी अशोक कडूस व वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांनी आंदोलन स्थळी भेट देवून शिक्षकांशी संवाद साधला. सदर प्रश्न राज्य पातळीवरचा असला तरीही, माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने सदरील प्रस्ताव स्विकारण्याचे आश्वासन देण्यात आले. आंदोलकांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरुपात शिक्षकांचे प्रस्ताव शिक्षण अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करुन आंदोलन मागे घेण्यात आले. २७ फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालय मुंबई यांनी जुनी पेन्शन बाबत निर्णय दिला असून, त्यामध्ये १नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर शंभर टक्के अनुदानावर आलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना (नियम १९८२) लागू करणे करिता शिक्षणाधिकारी यांना उपसंचालक यांच्याकडे स्क्रुटिनी सादर करण्याचे आदेश झालेले आहे. यामध्ये माध्यमिक शिक्षक, कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव निकालापासून ४५ दिवसात संस्थाने विविध कागदपत्रासह शिक्षण अधिकारी कार्यालयाकडे सादर करावे व उच्च माध्यमिकचे प्रस्ताव उपसंचालक कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे.

### शिक्षक संघटनांच्या वतीने अरुणकाकांसाठी श्री विशाल गणपती मंदिरात प्रार्थना

**नगर । वीरभूमी-**

ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनांच्या वतीने मंगळवारी (दि.८ एप्रिल) प्रार्थना करण्यात आली. तर दिव्यांग असलेल्या नचिकेत बोडखे या बालकाने देखील अरुणकाका आजारातून बरे होण्यासाठी श्री गणेशाला साकडे घातले. याप्रसंगी श्रीविशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा संचालक बाबासाहेब बोडखे, संचालक महेंद्र हिंगे, माजी संचालक बाळासाहेब राजळे, शिक्षक भारतीचे अध्यक्ष तथा संचालक आप्पासाहेब जगताप, प्रा. बाबा शिंदे, सुभाष भागवत, डाके सर, संतोष अडकित्ते, प्रकाश थोंडे, शेळके सर आदी उपस्थित होते. बाबासाहेब बोडखे म्हणाले की, आमदार अरुणकाका जगताप यांनी शिक्षक, शिक्षकेतरांचे नेहमीच प्रश्न सोडविण्याचे काम केले आहे. सर्वसामान्यांचे आधार व नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. अरुणकाका बरे व्हावे, ही सर्वांची इच्छा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्यावर पुणे येथील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, त्यांचा प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात शिक्षकांनी प्रार्थना केली. याप्रसंगी शिक्षक परिषद, शिक्षक भारती, माध्यमिक शिक्षक संघटना, माध्यमिक शिक्षक सोसायटी, जुनी पेन्शन कोअर कमिटी आदी शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे मनपाने हटवली

## महापालिकेचे रस्ते, मोकळ्या जागेतील अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा कारवाई : आयुक्त डांगे

**नगर । वीरभूमी-**

शहरातील विकास योजनेत मंजूर असलेल्या रस्त्यांची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत. काही ठिकाणी रस्त्याच्या कामात अतिक्रमणांचा अडथळा निर्माण झाला आहे. हसन शहा कब्रस्तान ते कोठी चौक व फरत हॉटेल ते कानडे मळा (जुना सोलापूर रोड) या दोन डीपी रस्त्याला जोडणाऱ्या लिंक रोडच्या कामात अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत. त्यामुळे या रस्त्याच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. शहरात इतरत्र रस्त्यात अडथळा ठरणारी अतिक्रमणे काढून घ्यावीत, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.



हसन शहा कब्रस्तान ते कोठी चौक व फरत हॉटेल ते कानडे मळा (जुना सोलापूर रोड) या दोन डीपी रस्त्याला जोडणाऱ्या लिंक रोडच्या कामात ११५ पेक्षा अधिक घरे व १२ पेक्षा अधिक व्यावसायिक टपऱ्या अडथळा ठरत होत्या. या अतिक्रमणांमुळे रस्त्याचे काम रखडले होते. सुमारे ४०० मीटर लांब व १२ मीटर रुंद असलेल्या या रस्त्याच्या कामासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजनेतून २ कोटी ७० लाखाचा निधी मंजूर झाला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पावसाळी गटारी, भुयारी गटार योजना व कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

अतिक्रमणामुळे अनेक दिवसांपासून रस्त्याचे काम रखडले होते. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी यात लक्ष घालून अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवण्याचे आदेश दिले. त्यानुसार अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकाने जेसीबीच्या सहाय्याने ११५ पेक्षा अधिक घरे व १२ पेक्षा अधिक टपऱ्यांची अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत. सायंकाळपर्यंत ही कारवाई सुरु होती. रस्त्याच्या मंजूर असलेल्या कामात नागरिकांची अतिक्रमणे असल्यास ती काढून घ्यावीत, अन्यथा कारवाई करण्यात येईल, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

### जायंटस ग्रुपच्यावतीने भगवान महावीर जयंतीनिमित्त जनावरांना चारा व औषध वाटप




**नगर । वीरभूमी-**

जगाला अहिंसेचा संदेश देणारे भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याण दिनानिमित्त जायंटस ग्रुप ऑफ अहिल्यानगरच्या वतीने प्राणीमात्रांप्रती आपुलकी दाखविणारा उपक्रम राबविण्यात आला. अरणगाव रोडवरील पांजरपोळ गोरक्षण संस्थेमध्ये जनावरांना चारा वाटप करण्यात आले तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घेत औषधे देखील पुरविण्यात आली.

या उपक्रमाच्या निमित्ताने अनेक सदस्यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन सेवा कार्यात योगदान दिले. जायंटस वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे, ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अभय मुथा, अनिल गांधी, दर्शन गुगळे, अमित मुनोत, श्वेता मुनोत, नूतन गुगळे, आशा कवाने, अंश मुनोत, पूजा पाथुरकर आदी यावेळी उपस्थित होते.

या सेवाभावी उपक्रमामुळे गोरक्षण संस्थेतील जनावरांना आधार देण्याचे काम करण्यात आले. भविष्यात देखील असे सामाजिक उपक्रम सातत्याने राबवण्याचा मानस या ग्रुपच्या वतीने व्यक्त करण्यात आले.

### अखेर देवगाव आणि लडगाव मध्ये गावकऱ्यांच्या एकजुटीने अवैध दारू विक्री बंद

**अकोले । वीरभूमी-**

तालुक्यातील देवगाव आणि लाडगाव मध्ये अवैध दारू विक्रेत्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट झाला होता. देवगाव येथे काही दिवसापूर्वी विशेष ग्रामसभा लावून प्रशासनाच्या आणि गावाकऱ्यांच्या सहविचाराने अवैध दारू बंद करण्याचा ठराव मंजूर करून दारू विक्रीत्याकडून लेखी लिहून घेण्यात आले होती. त्याचप्रमाणे मंगळवार दि. ९ रोजी लाडगाव येथे विशेष ग्रामसभा लावून ग्रामपंचायतच्या ठरावावर दारू विक्रेत्याकडून लेखी लिहून घेण्यात आले आहे.



यात असे म्हटले आहे की, मी लाडगाव (ता. अकोले) येथील रहिवाशी असून मी तीन वर्षे अवैध दारू धंदा केला. आत्ता मी ग्रामसभेत स्वतः लिहून देतो की, मी अवैध दारू धंदा बंद करत आहे. यापुढे मी कोणत्याही प्रकारे अवैध दारू विक्री करणार नाही. अवैध दारू विक्री केल्यास सर्व आजूबाजूच्या पेसा क्षेत्रातील गावकरी जी माझ्यावर कार्यवाही करतील ती मला मान्य असेल, असे सर्वासमोर लिहून देत आहे असे यात म्हटले आहे.

या लेखीवर ग्रामपंचायतीचा शिक्का आणि सरपंच यांची सही असून डिग्रसे लोकांच्या यावर सह्या आहेत. या ठरवाची प्रत राजूर पोलीस स्टेशन, राज्य उत्पादन शुल्क संगमनेर, तहसीलदार अकोले, गटविकास अधीकारी पंचायत समिती अकोले यांना पाठवण्यात आली आहे.

# अकोलेतील लॉजिंगवर पोलिसांचा छापा, तीन जोडपे पकडले

**अकोले । वीरभूमी-**

अकोले शहराजवळील राजुर रोडवरील नामांकित हॉटेल मल्हार प्लाझा लॉजिंगवर अकोले पोलिसांनी टाकलेल्या छाप्यामध्ये एक अल्पवयीन मुलीबरोबर एक तरुण व एक मध्यमवयीन महिला व पुरूष तसेच एक विवाहित जोडपे असे तीन जोडपे सापडले होते. यापैकी पोलिसांनी चार जणांना रात्री पोलिस स्टेशनला आणले होते. रात्री उशीरा अकोले पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून यातील मुख्य आरोपी सूरज विठ्ठल माने (रा. तांभोळ, ता. अकोले) तर सह आरोपी लॉजचा मालक रामहरी चौधरी याचे विरुद्ध पोक्सोचा गुन्हा दाखल केला व आज गुरुवारी या दोघांना अकोले न्यायालया समोर हजर केले असता त्यांना एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

अकोले शहर व परिसरात हॉटेल, लॉज परिसरात अनेक अवैध प्रकार सुरु असल्याची चर्चा असताना आज बुधवारी दुपारी अकोले पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अकोले शहरातील राजुर रोडवरील हॉटेल मल्हार प्लाझा लॉजिंग वर पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक खांडबहाले यांच्या पथकाने छापा मारला.यावेळी हॉटेलच्या वरच्या मजल्यावरिल रुम मध्ये एक अल्पवयीन मुलगी एका मुलासह व एक विवाहित पुरुष व विवाहित महिला एक विवाहित जोडपे अशी तीन जोडपे आढळुन आले.यावेळी पोलिसांनी हॉटेलचे रजिस्टर चेक केले. त्यानंतर दोन जोडप्यांना अकोले पोलिस स्टेशनला घेऊन आले. यानंतर यावेळी त्याचे नातेवाईकही पोलिस स्टेशनला आले. सायंकाळ पर्यंत तडजोडीचे प्रयत्न संपल्यानंतर पिडितेच्या वडिलांनी रात्री अकोले पोलिसात फिर्याद दिली की, यातील आरोपीत यांनी फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी हीस प्रेमाचे आमिष दाखवून मल्हार प्लाझा हॉटेल लॉजिंग बोर्डींग येथे नेऊन तिला लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले असल्याची फिर्याद दिल्याने अकोले पोस्टे गुरन -१८३/२०२५ BNS कलम- ७४, ७५ (१) (१) सह बालकांचे लैंगिक अपराध संरक्षण अधिनियम ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल केला तसेच या गुन्हाचे अधिक तपासात रात्री उशिरा लॉज चालक रामहरी भाऊसाहेब चौधरी याच्यावरही पोक्सो कलम १७ अन्वये गुन्हा दाखल करुन सूरज विठ्ठल माने व हॉटेल मल्हारचे चालक रामहरी भाऊसाहेब चौधरी यांना अटक करुन आज गुरूवारी दुपारी अकोले न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी मा. न्यायालयाने दोघानांही शुक्रवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पुढिल तपास पोलिस निरिक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. खांडबहाले हे करत आहेत.

सदर घटनेने अकोलेतील हॉटेल, लॉज व्यवसायाकांनी बोध घ्यायला हवा. अकोलेतील लॉज व्यवसायात सुरु असलेले काळे कारनामे उघड झाले असून या अनैतिक व्यवसायाचे मोठे रॅकेट असल्याची चर्चा शहरात सुरु आहे.

# अकोल्यातील एकल महिलांना लवकरच कौशल्य विकास प्रशिक्षण

## विनायक देशमुख । अकोले येथे साऊ एकल महिला समितीच्यावतीने एकल महिलांची बैठक

**अकोले । वीरभूमी-**

जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमात एकल महिलांना प्राधान्याने प्रशिक्षण देण्याचा निर्णय झाला असून त्याची सुरुवात अकोले तालुक्यातील एकल महिलांपासून करतो आहोत अशी घोषणा कौशल्य विकास कार्यक्रमाचे जिल्हा अशासकीय सदस्य विनायक देशमुख यांनी केली.

अकोले येथे साऊ एकल महिला समिती आयोजित एकल महिलांच्या सभेत ते बोलत होते. रोजगार करण्यास उत्सुक असलेल्या तालुक्यातील एकल महिला या सभेला उपस्थित होत्या.

श्री. देशमुख यांनी महिला सध्या करत असलेल्या कामाविषयी, त्यांना कोणते प्रशिक्षण आवश्यक आहे याची सविस्तर




माहिती घेतली. या महिलांचे सूक्ष्म सर्वेक्षण सुरू करण्याचे एकल महिला समितीला सांगितले.

स्वागत एकल महिला समितीच्या प्रतिमा कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक करताना हेरंब कुलकर्णी यांनी एकल महिलांचे रोजगार हेच पुनर्वसन असल्याने तालुक्यातील किमान १०० व्यवसाय सुरू करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.

त्यानंतर महिलांनी व्यवसाय सुरू करण्याविषयी त्यांच्या अडचणी मांडल्या. कोणता व्यवसाय सुरू करणार ? याविषयी त्यांचे कल सांगितले. विनायक देशमुख यांनी त्याबाबत लवकरच प्रशिक्षण सुरू होतील असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंत मनकर यांनी व्यवसाय सुरू करण्याबाबत व मार्केटिंगविषयी मदत करण्याची तयारी दर्शवली. ग्रामीण भागातून निर्माण होणारा माल शहरी भागात विकण्याची साखळी तयार करण्याची आवश्यकता मांडली. त्यानंतर निलेश तळेकर, भाऊसाहेब वाकचौरे, नवनाथ नेहे, सरपंच रवी मालुंजकर, मनोज गायकवाड यांनी विविध सूचना केल्या. यावेळी नगरसेवक प्रतिभा मनकर, पत्रकार श्रीनिवास रेणुकादास उपस्थित होते. रोटरी क्लबचे अध्यक्ष प्राचार्य विद्याचंद्र सातपुते यांनी व्यावसायिक मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला.

### शासकीय मालमत्तेची चोरी असूनही कारवाई नाही; २१ एप्रिलपासून आमरण उपोषणाचा इशारा

**नगर । वीरभूमी-**

मौजे बांगर्डे (ता. श्रीगोंदा) येथील दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईप चोरून नेल्याच्या प्रकरणात संबंधित आरोपीवर अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने ग्रामपंचायतीवर व ग्रामसेवकांवर पक्षपाती कारभार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबतची तक्रार घनश्याम शेळके यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे.

तक्रारीनुसार, पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईप एका व्यक्तीने चोरून नेऊन स्वतःच्या गोठ्यात वापरले होते. याबाबत पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या आदेशानुसार पंचनामा देखील करण्यात आला. यानंतर संबंधित आरोपी दिनकर शेळके याने सदर पाईप ग्रामपंचायतीकडे परत केले. मात्र शासकीय मालमत्तेची चोरी स्पष्ट असूनही अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

तक्रार, उपोषण व आंदोलने करूनही ग्रामसेवक व सरपंच यांनी आरोपीला पाठीशी घालून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप घनश्याम शेळके यांनी केला आहे. गावात या प्रकरणात आर्थिक तडजोड झाल्याचीही चर्चा रंगली आहे. गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती यांनीही याप्रकरणी कारवाईसाठी सूचना व लेखी पत्रे दिली आहेत.

या प्रकारामुळे ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करून, शासकीय मालमत्ता चोरल्याबद्दल संबंधित व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# ‘जगा व जगू द्या’ संदेश देत पाथर्डी शहरात भव्य शोभायात्रा

## पाथर्डीत जैन धर्माचे चोवीसावे तीर्थकार भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक दिन उत्साहात साजरा

**पाथर्डी । वीरभूमी–**

जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक (महावीर जयंती) निमित्त भव्य शोभायात्रा पाथर्डी शहरातुन मोठ्या भक्तिमय वातावरणात काढण्यात आली. ढोल ताशांच्या गजरात सत्य व अहिंसेचा संदेश देणाऱ्या भगवान महावीरांच्या विचारांचे स्मरण करीत जैन बांधवांनी महावीर स्वामींचा ‘जगा व जगू द्या’ हा संदेश दिला. समस्त प्राणीमात्रांचे कल्याण हाच मानवधर्म असल्याची शिकवण देणारी व अहिंसा परमो धर्म:, असे संदेश या शोभायात्रेतुन देण्यात आले. जैन धर्म की जय, जय जिनेंद्र, जय महावीर, जय आनंद या घोषणांनी शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

सकाळी शहरातील नवीपेठ येथून या शोभायात्रेस सुरुवात झाली यावेळी तहसीलदार डॉ उद्धव नाईक, राष्ट्रवादीचे नेते प्रताप ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रावक संघाचे अध्यक्ष सुभाष चोरडिया, सचिव सुरेश गुगळे, महावीर युवा मंचचे सुनील गुगळे, श्री तिलोक जैन संस्थेचे सचिव सतीश गुगळे, हेमंत गुगळे, संतोष पटवा, संजय सेटीया, विश्वजीत गुगळे, सुनिल गांधी, राजेंद्र गुगळे, आनंद चोरडिया, विजय सुनावत यांच्यासह शेकडो जैन बांधव उपस्थित होते.

मिरवणूकीनंतर जैन स्थानकात समाज प्रबोधनकार उद्धव महाराज चन्ने यांचे महावीरांच्या जीवनावर प्रवचन झाले. याप्रसंगी बोलताना उद्धव महाराज चन्ने म्हणाले की, भगवान महावीरांनी समस्त मानवजातीबरोबरच भूतलावरील प्रत्येक प्राणीमात्राच्या कल्याणाचा संदेश दिला. सत्य व अहिंसेचे तत्त्वज्ञान त्यांनी समाजाला दिले. अहिंसा परमो धर्म: सांगणारे त्यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत.

भगवान महावीर स्वामी यांचे विचार आचरणात आणल्यास प्रत्येकाचे कल्याण साधते. भगवान महावीर यांनी आपल्याला प्राप्त झालेल्या आत्मज्ञानाचा उपयोग त्यांनी समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी केला. अनेकांतवाद, अहिंसा, सत्य आणि अपरिग्रहाचा विचार त्यांनी कायम मांडला. जो आजच्या काळातही तितकाच महत्त्वपूर्ण आहे.

तहसीलदार डॉ. नाईक व राष्ट्रवादीचे नेते प्रताप ढाकणे यांनी शोभायात्रेच्या प्रारंभी उपस्थिती लावून महावीर अनुयायांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ढाकणे म्हणाले की, आज हजारो वर्षानंतरही भगवान महावीर स्वामींचे विचार मानव जातीला तारणारे आहेत. यातूनच त्यांची महानता कळून येते. आपण भगवान महावीरांचे अनुयायी आहोत याचा अभिमान बाळगला पाहिजे. आजच्या जगात युध्दजन्य परिस्थिती आहे. अशावेळी भगवान महावीरांच्या विचारांची गरज आहे. भगवान महावीर यांच्यामुळे आपण आहोत हे लक्षात ठेवून प्रत्येकाने मनोमन त्यांचे तत्वज्ञान जीवनात अंमलात आणण्याचा संकल्प



करावा. बहु मंडळाचे वीर स्तुती गीत, कु. हितेशी लुनावत यांची महावीरांच्या जिवनावर आधारीत कविता व राजेंद्र गांधी यांच्या भगवान महावीरांच्या जन्मा निम्मित पाळणा गीताने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाच्या शेवटी हेमंत गुगळे परिवाराच्यावतीने गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली. पुढील वर्षीची गौतमी प्रसादी घेणाऱ्या प्रितेश पटवा व पटवा परिवाराच्या वतीने गुगळे यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रास्ताविक सुरेश गुगळे यांनी केले तर चंदन कुचेरीया यांनी आभार मानले.

# अहिल्यानगर जिल्ह्याचा २० वर्षाखालील फुटबॉल संघ जाहीर

## आंतर जिल्हा फुटबॉल स्पर्धेसाठी संघ लोणावळा येथे रवाना

**नगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्याचा २० वर्षाखालील फुटबॉल संघ जाहीर करण्यात आला आहे. संघाची निवड भुईकोट किल्ल्याच्या मैदानावर नुकतेच पार पडलेल्या निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरातून झाली आहे. या निवड चाचणीत ५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग लाभला होता.



निवड चाचणीत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या खेळाडूंची जिल्ह्याच्या संघात निवड करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या २० वर्षाखालील फुटबॉल संघात कर्णधार- रुषभ गोपाळ मणी, अभिवाचन सोनाजी थोंबे, आदित्य राजेश तळेकर, अक्षय नान्दू कोटकर, अम्मार शेख, अर्मान शेख, यश गोकुळ कोतकर, जिनेश संतोष छल्लाणी, जॉय पंकज शेलळे, मंथन मनोज कदम, ओम राहुल म्हस्के, पियुष विष्णू भोसले, रोहित प्रमोद पवार, साहिल राजू उर्मुडे, साहिल संतोष कुसळकर, स्वराज राजाभाऊ वाघमारे, उत्कर्ष मनीष सोनवणे, वेदांत नितीन दिकोंडा या खेळाडूंचा समावेश आहे.

लोणावळा (जि. पुणे) येथे होणाऱ्या २० वर्षाखालील आंतर जिल्हा फुटबॉल स्पर्धा होणार असून, अहिल्यानगर जिल्ह्याचा पहिला सामना ११ एप्रिल रोजी रत्नागिरी जिल्ह्याविरुद्ध होणार आहे. या स्पर्धेसाठी संघाचे खेळाडू रवाना झाले आहेत. संघाचे मार्गदर्शक प्रशिक्षक म्हणून विक्टर जोसेफ काम पाहत असून, त्यांना अभिषेक सोनवणे सहाय्यक प्रशिक्षक म्हणून साथ देत आहेत.

या निवड चाचणीसह खेळाडूंना प्रशिक्षण व स्पर्धेला पाठविण्यासाठी संपूर्ण नियोजनात अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे मानद सचिव रोनाप फर्नांडिस यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. खेळाडूंच्या निवडीपासून ते त्यांच्या नोंदणी व संघ बांधणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्यांचे मोलाचे योगदान लाभले. असोसिएशनचे कार्यकारी सदस्य रिषपालसिंग परमार, जोगासिंग मिन्हास व प्रदीप जाधव यांनीही संघाच्या व्यवस्थापनासाठी मोलाचे सहकार्य केले. खालिद सय्यद आणि राजू पाटोळे यांनी मैदानावर राहून संघाला मार्गदर्शन केले.

असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांनी संघाला शुभेच्छा देऊन जिल्ह्यातील युवा खेळाडूंकडून मोठी अपेक्षा व्यक्त केली.

# युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रयत्नांतून दोन वीजउपकेंद्र कोपरगाव ग्रामीणला लवकरच जोडले जाणार

**कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील पोहेगाव, रांजणगाव देशमुख येथील २ सब स्टेशन राहता तालुक्याला जोडलेले आहेत. अनेकदा विजेच्या समस्या निर्माण झाल्यास नागरिकांना वेळेवर प्रश्न सुटत नव्हते. महावितरण कार्यालयाने यावर कार्यवाही करावी यासाठी कोपरगांव तालुक्यातील शेतकऱ्यांनी अनेकदा कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्याकडे आपल्या व्यथा मांडल्या होत्या. त्यानुसार कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही समस्या मांडली होती.नुकतेच वरिष्ठ स्तरावर आदेश झाले असून लवकरच कोपरगाव ग्रामीणला हे दोन सबस्टेशन जोडले जाणार असल्याने विवेकभैय्या कोल्हे यांच्या प्रयत्नांना यश मिळाले



आहे याबद्दल नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

समस्या निवारण बैठकीतून विवेकभैय्या कोल्हे यांना वीजेच्या समस्या बद्दल पोहेगाव, रांजणगाव देशमुख आणि चांदेकसारे परिसरातील नागरिकांनी अनेकदा या प्रश्नावर तक्रारी केल्या होत्या. दोनही सबस्टेशन कोपरगाव तालुक्यात जोडले गेले तर समस्या निर्माण झाल्यास त्या सोडवण्यासाठी आम्हाला सोयीस्कर ठरेल, अशी या नागरिकांनी अपेक्षा व्यक्त केली होती. तत्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबद्दल पत्रव्यवहार करून विवेकभैय्या कोल्हे यांनी हा प्रश्न सोडवण्यासाठी लक्ष घालण्याची विनंती केली असता मुख्यमंत्री कार्यालयाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले असून लवकरच याबद्दल कार्यवाही सुरू होणार आहे.

अनेकदा वीजप्रवाह खंडित झाला अथवा ट्रान्सफॉर्मर बंद पडल्यास नागरिकांना थेट राहता येथे संपर्क करावा लागत होता. या समस्येला सोडवण्यासाठी विवेकभैय्या कोल्हे यांनी प्रयत्न केल्याने लवकरच हा प्रश्न निकाली निघणार आहे. विजेच्या वारंवार होणाऱ्या लपंडावामुळे त्रस्त नागरिकांना या निर्णयाने दिलासा मिळणार असून वीस ते पंचवीस गावातील विद्युत क्षेत्रातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# पिण्यास पाणी मिळण्यासाठी व अनाधिकृत पाणी उपशाविरोधात लहुजी शक्ती सेनेचे उपोषण




**नगर । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यातील भावडी गावातील ग्रामपंचायतच्या विहिरीतून अनुसूचित जातीच्या समाजबांधवांसह ग्रामस्थांना पिण्याचे पाणी मिळावे, तसेच विहिरीतून अनधिकृतपणे पाणी उपसा करणाऱ्या मोटारी काढाव्यात, या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेच्या वतीने जिल्हा परिषदेसमोर उपोषण करण्यात आले.

उन्हाळा सुरु झाल्याने पाण्याची टंचाई जाणवत असून ग्रामस्थांना पिण्यासाठी तसेच दैनंदिन गरजांसाठी पाणी मिळत नसल्याने मोठ्या प्रमाणावर हाल सहन करावे लागत असल्याने यावेळी उपोषणकर्त्यांनी जोरदार निदर्शने देखील केले.या उपोषणात लहुजी शक्ती सेनेचे तालुकाध्यक्ष नवनाथ शिंदे, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय शिंदे, परशुराम शिंदे, जनार्दन चव्हाण, गोरक्षनाथ शिंदे, संजय शिंदे, सुनील शिंदे, संजय कोरडकर, दशरथ शिंदे, मुक्ताबाई शिंदे, वैशाली शिंदे, पूजा शिंदे, अर्चना शिंदे, संगीता शिंदे, राणी चव्हाण, उषा शिंदे, पार्वती शिंदे आदींसह गावातील अनेक ग्रामस्थ सहभागी झाले होते.

भावडी गावठाण येथील ग्रामपंचायत मालकीची विहीर पूर्णपणे शासकीय जागेत असून, उप अभियंता ग्रामपंचायतीने केलेल्या चौकशीतून विहीर ऑक्टोबर १९६५ मध्ये खोदण्यात आल्याचे, तसेच सप्टेंबर १९९८ मध्ये विद्युत पंपाची दुरुस्ती झाल्याचे निदर्शनास आले आहे. तरीही शेजारील काही शेतकरी या विहिरीत अनधिकृत मोटारी टाकून शेतीसाठी पाणी वापरत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यामुळे दलित वस्तीत पाण्याची टंचाई निर्माण झाली असून, पिण्यासह दैनंदिन वापरासाठी आणि जनावरांसाठी पाणी मिळणे कठीण झाले आहे.

ग्रामस्थांनी अनेकवेळा जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी करूनही योग्य प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे अखेर उपोषणाचा मार्ग पत्करल्याचे लहुजी शक्ती सेनेचे तालुकाध्यक्ष नवनाथ शिंदे यांनी सांगितले.

# श्रीगोंद्यात भगवान महावीर स्वामी जन्म कल्याणक दिन भक्तीमय वातावरणात साजरा

**श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा येथे भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक सकल जैन संघ आयोजित भगवान महाविर जयंती उत्साह व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. श्रमण भगवान महावीर स्वामी यांचा जन्म इ.स. पूर्व ५९९ याच तिथीला कुंडलपूर शहरात झाला होता. भगवान महावीरांनी त्यांच्या जीवनात व त्यांच्या आचरणातून जे काही सांगितले आहे त्याच पदचिन्हावर मार्गक्रमण करीत जैन समाज मार्गक्रमण करीत आहे. भगवान महावीरांचे चरित्र अहिंसा, सत्य, अपरिग्रह ब्रह्मचर्य व तप या सिद्धांतावर आधारित आहे.





श्रीगोंदा सकल जैन संघात भगवान महावीर स्वामी जन्मकल्याणक दिनानिमित्त सकल समाजाने यावर्षी प्रथमच श्रीगोंदा शहरात व संपूर्ण तालुक्यातून जैन बांधव एकत्रित येत एकाच ठिकाणी भगवान महावीरांचा जन्म कल्याण दिन साजरा करण्याचे ठरवण्यात आले. व त्यास सर्व तालुक्यातून भरभरून प्रतिसाद मिळाला. श्रीगोंदा तालुक्यातील सर्व गावातील जैन बांधव श्रीगोंद्यात एकत्र येत सकाळी ७ वा. जैन स्थानक श्रीगोंदा येथून भगवान महावीर स्वामींच्या प्रतिमेची शोभायात्रा सुरू करण्यात आली.

ही शोभायात्रा शिवाजी चौक, शनी चौक, जोधपुर मारुती चौकमार्गे बालाजी मंगल कार्यालयात संपन्न करण्यात आली. शोभायात्रेत सर्व जैन बांधवांनी सफेद वस्त्र परिधान केले होते व जैन भगिनींनी सौभाग्याचं प्रतीक असणारे लाल वस्त्र परिधान केले होते. शोभायात्रा मार्गक्रमणात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. मुख्य कार्यक्रमात महावीर स्वामींच्या जीवनावर आनंदजी बंब यांनी प्रकाश टाकला.

यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते, अनुराधाताई नागवडे, माजी आमदार राहुल जगताप, टिळक भोस, स्मितल वाबळे, शुभांगी पोटे, मच्छिंद्र शिंदे, अशोकराव खेंडके, बापूतात्या गोरे, संतोष क्षीरसागर, गणेश भोस, सतीश बोरुडे, दिलीप मेहता, वैभव दिलीप मेहता उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन विजय मुथा यांनी केले. सकल जैन संघाचे अध्यक्ष विजय बोरा यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर आभार नवनीत मुनोत यांनी मानले.